सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३८ | रविवार, दि. २ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## निवेदन

भारताच्या रणरागिणी आयसीसी वर्ल्डकप २०२५च्या अंतिम फेरीत प्रथमच पोहोचल्या. त्यांची रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी दक्षिण आफ्रिका संघाशी विजेतेपदासाठी अटीतटीची लढत होणे क्रिकेटप्रेमींना अपेक्षित आहे. त्यामुळे दररोज प्रसिद्ध होणारे 'मसाला पान' रद्द करून महिला क्रिकेट विश्वचषक-२०२५ हे विशेष पान देत आहोत, याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

– संपादक


ग्लोबल महातेज | महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ | २

भारत की दक्षिण आफ्रिका?

फायनल मध्ये कोण बाजी मारणार? पाहा दोन्ही संघांचा हेड-टू-हेड रेकॉर्ड

रोहितकडून ऑस्ट्रेलियाला हरवण्याचा प्लॅन? स्मृती अन् जेमिमासोबतचा व्हिडिओ आला समोर

जेव्हा धोनीने जेमी रॉड्रिग्जला विचारले होते बॅटचे वजन; म्हणाला, "तू तर माझ्यापेक्षा..."

टीम इंडियाला फायनलमध्ये पोहोचविणारा पडद्यामागचा शिलेदार अमोल मुजुमदार?

# सुरत मार्गावर आणखी दोन रेल्वे गाड्यांची घोषणा

## जळगाव जिल्ह्यातील प्रवाशांना होणार फायदा; थांबे आणि वेळापत्रक जाणून घ्या....



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पश्चिम रेल्वेकडून विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या गाड्यांना जळगाव आणि भुसावळ रेल्वे स्थानकावर थांबा मिळाला आहे. यामुळे जळगावच्या प्रवाशांची सोय झाली आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी पश्चिम रेल्वेकडून आठवड्याच्या विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ओखा-मदुराई आणि राजकोट -महबुबनगर दरम्यान या दोन नवीन गाड्या धावणार आहेत. ओखा-मदुराई ओखा पश्चिम रेल्वेकडून ०९५२० ही गाडी ३ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान प्रत्येक सोमवारी रात्री १० वाजता सुटेल आणि जळगाव रेल्वे स्थानकावर दुसऱ्या दिवशी सायंकाळी ६ वाजून ३५ मिनिटाने तर भुसावळला सायंकाळी ७ वाजेला पोहोचेल. यानंतर गुरुवारी सकाळी ११: ४० वाजता मदुराईला पोहोचेल. गाडी क्रमांक ०९५१९ मदुराई-ओखा ही ७ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२५ दरम्यान प्रत्येक शुक्रवारी पहाटे ४ वाजता सुटेल आणि रविवारी सकाळी १०: २० वाजता ओखाला पोहोचेल.

**असे असतील तिचे थांबे**

द्वारका, जामनगर, राजकोट, सुरेंद्रनगर, अहमदाबाद, नडियाद, आनंद, वडोदरा, भरूच, उधना, नंदुरबार, अमळनेर, जळगाव, भुसावळ, अकोला, पूर्णा, हजूर साहिब नांदेड, निजामाबाद, काचेगुडा, महबूबनगर, ढोणे, गूटी, रेनिगुंटा, काटपाडी, वेल्लोर कॅन्टोन्मेंट. तिरुवन्नमलाई, विल्लुपुरम, श्रीरंगम, तिरुच्चिरापल्ली, मानपराई, दिंडीगुल आणि कोडाईक्कनाल रोड स्टेशन दोन्ही दिशांनी.

**राजकोट-महबूबनगर- राजकोट**

गाडी क्रमांक ०९५७५ राजकोट-महबूबनगर ही ३ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान प्रत्येक सोमवारी दुपारी १: ४५ वाजता सुटेल आणि जळगाव स्टेशनवर दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजून २८ मिनिटाने तर भुसावळला ५ वाजून ५ मिनिटाने पोहोचेल. यानंतर त्याच दिवशी रात्री ८ वाजता महबूबनगरला पोहोचेल. तसेच गाडी क्रमांक ०९५७६ महबूबनगर-राजकोट ही गाडी ४ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०२५ दरम्यान प्रत्येक मंगळवारी रात्री ११ वाजता सुटेल आणि गुरुवारी सकाळी ५ वाजता राजकोटला पोहोचेल.

**असे असतील तिचे थांबे**

वांकानेर, सुरेंद्रनगर, अहमदाबाद, नडियाद, आणंद, वडोदरा, उधना, नंदुरबार, जळगाव, भुसावळ, अकोला, वाशीम, हिंगोली, वसमत, पुर्णा, हजूर साहिब नांदेड, धर्माबाद, बसर, निजामाबाद, कामरेड्डी, मेडचाळ, काचेगुडा, उमदानगर, शादनगर आणि जडचेर्ला स्टेशन दोन्ही दिशेने.

सर्व गाड्यांमध्ये एसी २ टियर, एसी ३ टियर, स्लीपर व सामान्य दर्जाचे डबे असतील. प्रवाशांनी तिकीट बुकिंग आणि थांब्यांची सविस्तर माहिती www.enquiry.indianrail.gov.in किंवा http://www.irctc.co.in वर पाहू शकतात. प्रवासापूर्वी वेळापत्रक आणि थांबे तपासूनच प्रवासाची योजना आखावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना केले आहे.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# पथदिव्यांनी उजळला तांबेपुरा बोगदा

## दै. ग्लोबल महातेजच्या बातमीचा दणका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहरातील सुभाष चौकातून तांबेपुरा भागात जाणारा रेल्वे बोगदा आहे. मात्र, या बोगद्यात अनेक दिवसांपासून पथदिवे नसल्याने प्रवाशांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत दै. ग्लोबल महातेजने २६ ऑक्टोबर रोजी ठळक वृत्त प्रकाशित केले होते. याची दखल घेऊन पालिकेने बोगद्यात पथदिवे बसविले आहेत. यामुळे प्रवाशांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

या रेल्वे बोगद्यातून पुढे विप्रो कंपनी, तांबेपुरा, साने नगर तसेच विविध खेड्यांकडे जाणारा रस्ता आहे. या बोगद्यातून रोज हजारो नागरिक प्रवास करतात. मात्र, अंधारामुळे वाहनधारक, विद्यार्थी विशेषतः महिलांना अंधारातून मार्गक्रमणकरावे लागत होते. परिसरात कुठेही पथदिवे नसल्याने लहान मोठे अपघात घडत होते. विप्रो कंपनीत जाणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही याचा त्रास सहन करावा लागत होता. सायंकाळनंतर पूर्ण अंधार होत असल्याने अडथळा निर्माण होत होता. या अंधाराचा गैरफायदा घेऊन भुरटे चोरट्यांचा वावर या परिसरात वाढला होता. यामुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली होती. बोगद्यात पथदिव्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांसह प्रवाशांनी केली होती. याबाबत नागरिकांनी दै. ग्लोबल महातेजकडेही व्यथा मांडली होती. दै. ग्लोबल महातेजने याबाबत छायाचित्रासह ठळक वृत्त प्रकाशित केल्याने ही समस्या सुटली आहे. याबद्दल प्रवाशांसह परिसरातील नागरिकांकडून दै. ग्लोबल महातेजचे कौतुक होत आहे.


ग्लोबल महातेज

26 Oct 2025 - Page 1

तांबेपुरा रेल्वे बोगदा अंधारात!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

शहरातील सुभाष चौकातून तांबेपुरा भागात जाणारा रेल्वे बोगदा आहे. मात्र, या बोगद्यात अनेक दिवसांपासून पथदिवे नसल्याने प्रवाशांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या बोगद्यातून पुढे अनेक गावांकडे जाणारा रस्ता आहे. बोगद्यात पथदिव्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांसह प्रवाशांनी केली आहे.

या रेल्वे बोगद्यातून पुढे विप्रो कंपनी, तांबेपुरा, साने नगर तसेच विविध खेड्यांकडे जाणारा रस्ता आहे. या बोगद्यातून रोज हजारो नागरिक प्रवास करतात. मात्र, अंधारामुळे वाहनधारक, विद्यार्थी विशेषतः महिलांना अंधारातून मार्गक्रमणकरावे लागते. परिसरात कुठेही पथदिवे नसल्याने वाहनचालकांना अंदाज येत नाही. परिणामी लहान- मोठे अपघात वाढले आहेत. विप्रो कंपनीत जाणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही याचा त्रास सहन करावा लागतो. सायंकाळनंतर पूर्ण अंधार होत असल्याने अडथळा निर्माण होतो. या अंधाराचा गैरफायदा घेऊन भुरटे चोरट्यांचा वावर या परिसरात वाढला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. याबाबत पालिका प्रशासनाने लक्ष देऊन पथदिवे तत्काळ बसवावेत, अशी मागणी होत आहे.





# मोकाट गुरांचा उच्छाद, कायमस्वरुपी उपाययोजनेची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील रस्त्यांवर मोकाट गुरांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसह प्राण्यांच्या जीवालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. बाजारपेठा, शाळा परिसर, स्टेशन रोडसारखी गर्दीची रस्ते आणि शहरातील दुभाजकांवर या गुरांचा मुक्त वावर पाहायला मिळतो.

काही ठिकाणी वाहनांनी कितीही हॉर्न वाजवले, शेपटी पीळली, काठीने मारले तरीही तसूभरही न हलणारा गुरांचा ठिय्या बघावयास मिळतो. त्यामुळे व्यापारी व नागरिकांमध्ये भीती आणि अस्वस्थता वाढली आहे. जेव्हा ही गुरे धावून येतात तेव्हा त्यांचे अंगात ठासून भरलेल्या भीतीने खूपच हाल होतात. यामुळे अनेक नागरिक जखमी झाले आहेत. काही गुरांचे मालक मात्र या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करून आपली गुरे रस्त्यावर मोकाट सोडून घरी निवांत बसतात.ही गुरे चोरीस गेल्यास पुन्हा वेगळी समस्या किंवा वाद उद्भवू शकतो. स्टेशन रोड परिसरात नुकताच एक हृदय पिळवटून टाकणारा प्रसंगही घडला आहे. उपाशी जनावरे भुकेपोटी रस्त्याच्या कडेला कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अन्न शोधतांना प्लास्टिकच्या पिशव्या , काचेचे व धातूचे तुकडेही गिळतात. त्यामुळे त्यांना असह्य पोटदुखीचा त्रास होतो. त्यामुळे त्यांची होणारी तडफड पाहिली जात नाही. हा दुर्दैवी प्रकार दिवसा घडला तर काही संवेदनशील नागरिक त्यांना वैद्यकीय मदत करतात. मात्र रात्री - बेरात्री हा त्रास झाल्यास सदर जनावरे अक्षरशः तडफडून मरतात. शहरातील रस्त्यांच्या दुभाजकांवर लावलेली झाडेही या गुरांसाठी लक्ष्य बनली आहेत. गुरे त्यांचे डोके लावून फांद्या उपटण्याचा प्रयत्न करतात. दुभाजकावर चढून पालापाचोळा खातात आणि परिसरात अस्वच्छता पसरवतात. अनेक झाडे यामुळे मुळासकट उपटली जाऊन नामशेष झाली आहेत. पालिकेने मोकाट जनावरांच्या या समस्येवर कायमस्वरुपी ठोस उपाययोजना करावी .निष्काळजी मालकांवर कठोर कारवाई करावी अशी व्यापक मागणी होत आहे.

## रानडुकराच्या हल्ल्यात वृद्ध गंभीर जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- रान डुकराने चढविलेल्या हल्ल्यात एक वृद्ध गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी सहाच्या सुमारास शहरातील शिरुडनाका परिसरात घडली. गजानन आनंदा चौधरी (वय ८५) असे त्यांचे नाव असून, ते सकाळी दुध घेण्यासाठी गेले होते. परिसरातील नागरिकांनी त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. शहरात रान डुकराचा शिरकाव झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने शोध घेऊन रानडुकराचा बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. दरम्यान, सदर रानडुकराने ज्याच्यावर हल्ला केला त्याच्या जखमांचे छायाचित्र कोणत्याही संवेदनशिल नागरिकाकडून पाहिले जाणेच शक्य नाही. 'दै. ग्लोबल महातेज'कडे ते उपलब्ध आहेत. मात्र, ते आम्ही प्रसिद्ध करु शकत नाही.

# महाराष्ट्र केसरी सिकंदर शेखला अवैध पिस्तूल विक्री प्रकरणी अटक

## राजस्थानातील कुख्यात टोळीशी संबंध असल्याचे उघड; महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्रात खळबळ



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि महाराष्ट्र केसरी विजेता सिकंदर शेखला पंजाब पोलिसांनी शस्त्रतस्करी प्रकरणी अटक केली. तपासात राजस्थानातील पपला गुर्जर टोळीशी संबंध असल्याचे उघड झाले आहे. यामुळे कुस्ती क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. कोल्हापूरातील गंगावेश तालमीत सराव केलेला आणि महाराष्ट्र केसरी किताबाचा मानकरी ठरलेला आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सिकंदर शेख याला पंजाब पोलिसांनी शस्त्र तस्करी प्रकरणी अटक केली.

सीआयए पथकाने पपला गुर्जर टोळीला शस्त्र पुरवठा करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करुन चार जणांना अटक केली आहे. त्यामध्ये सिकंदर शेखचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडून १ लाख ९९ हजार रुपये रोख, एक पिस्तूल (०. ४५ बोर), चार पिस्तूल (०. ३२ बोर), काडतुसे, स्कॉर्पिओ-एन आणि एक्सयूव्ही या दोन गाड्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी खरड (पंजाब) पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्टखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पपला गुर्जर टोळीशी थेट संबंध एसएसपी हरमन हंस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, की अटक करण्यात आलेले आरोपी हरियाणा आणि राजस्थानात सक्रिय असलेल्या विक्रम ऊर्फ पपला गुर्जर टोळीशी थेट संबंधित आहेत. आरोपी उत्तर प्रदेशातून शस्त्रे आणून ती पंजाब आणि परिसरात पुरवत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. दरम्यान यामध्ये तिघेजण गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले आहेत. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्याच्या सिकंदर शेखची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासण्यासाठी महाराष्ट्र पोलिसांशी आम्ही संपर्क साधल्याची माहिती हंस यांनी दिली. महाराष्ट्र केसरीपासून शस्त्र साखळीकडे सिकंदर शेख हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटू आहे. त्याने आर्मीमध्ये क्रीडा कोट्यातून भरती घेतली होती. मात्र, काही काळानंतर नोकरी सोडली.

# जेमिमाची मानसिक कणखरता वाखाणण्याजोगी!

## ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीकडून तोंडभरून कौतुक



**ग्लोबल महातेजव वृत्तसेवा**

महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीत भारताच्या विजयात निर्णायक खेळी करणाऱ्या जेमिमा रॉड्रिग्ज हिने अखेरपर्यंत दाखविलेली मानसिक कणखरता विलक्षण होती, अशी प्रतिक्रिया ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीने व्यक्त केली. एकदिवसीय कारकीर्दीमधील तिसरी आणि विश्वचषकातील पहिली शतकी खेळी करताना जेमिमाने नाबाद १२७ धावा केल्या. तिच्या या कामगिरीने भारताला उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाच्या ३३८ धावांच्या विक्रमी आव्हानाचा पाठलाग करणे शक्य झाले.

" सामना संपण्यास चार-पाच षटके शिल्लक असतानाही आम्ही धीर सोडला नव्हता. मात्र, प्रतिस्पर्ध्यावर पुरेसे दडपण आणण्यात तुम्ही अपयशी ठरलात, तर यश तुमच्यापासून दुरावते आणि हेच आज आमच्याबाबतीत घडले. जेमिमाने ज्या मानसिकतेने फलंदाजी केली ती विलक्षण होती," असे हिली म्हणाली. कर्णधार हिली ऑस्ट्रेलियाच्या कामगिरीबाबत कमालीची निराश होती. "आमची एकही खेळाडू विजयासाठी खेळत आहे, असे वाटत नव्हते. अशा महत्त्वाच्या सामन्यात अशा क्षुल्लक चुका अपेक्षित नसतात. फलंदाजीतून निर्माण केलेल्या संधीचा फायदा घेण्यात आम्ही अपयशी ठरलो. आव्हानाचा पाठलाग करताना आमचा खेळ सामान्य होता. जेमिमाला दिलेली दोन जीवदाने आम्हाला महागात पडली," असेही हिली म्हणाली.

" जेमिमाचे दोन झेल आम्ही सोडले. मात्र, त्यामुळे तिच्या खेळीचे महत्त्व कमी होत नाही. तिने दाखविलेली मानसिक कणखरता सर्वोत्तमच होती. संघाला विजयापर्यंत नेण्यासाठी अखेरपर्यंत खेळपट्टीवर राहण्याचे तिचे नियोजन जबरदस्त होते," अशा शब्दांत हिलीने जेमिमाच्या खेळीचे कौतुक केले. " जेमिमा आणि हरमनप्रीत यांच्यात झालेली १६७ धावांची भागीदारीही निर्णायक ठरली. फलंदाजीसाठी पोषक असलेल्या खेळपट्टीचा या दोघींनी चांगला फायदा घेतला. या जोडीवर अंकुश ठेवू शकलो नाही हे आमच्यासाठी सर्वांत निराशाजनक होते. संघाला जेव्हा गरज असते, तेव्हा हरमनप्रीत पुढे येऊन खेळते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले," असे हिलीने सांगितले.



> यावेळी महिला क्रिकेटला नवा विश्वविजेता मिळणार आहे. भारतीय संघाला चाहत्यांकडून किती पाठिंबा मिळतो, हे या स्पर्धेत दिसून आले आहे. अंतिम सामना घरच्या मैदानावर खेळण्याची संधी मिळणे, ही भारतीय संघासाठी महत्त्वाची बाब ठरू शकेल. यंदाची विश्वचषक स्पर्धा अत्यंत चुरशीची झाली यात शंका नाही. महिला क्रिकेटची प्रगती सुरू राखण्यासाठी आता अधिक एकदिवसीय सामने खेळले जाणे अपेक्षित आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर द्विदेशीय मालिकांची संख्या वाढायला हवी.
>
> – **एलिसा हिली,** ऑस्ट्रेलियाची कर्णधार

# भारत की दक्षिण आफ्रिका ?

## फायनल मध्ये कोण बाजी मारणार ? पाहा दोन्ही संघांचा हेड-टू-हेड रेकॉर्ड





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संघाने आयसीसी महिला वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अंतिम फेरीत विजेतेपद पटकावण्यासाठी भारतीय संघाचा सामना बलाढ्य दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार आहे. या स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला पराभूत केले. भारतीय संघाला विजय मिळवून देण्यात कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांनी मोलाची भूमिका बजावली. आता भारत आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही संघ पहिल्यांदाच विजेतेपदासाठी अंतिम फेरीत आमने-सामने येणार आहेत. दरम्यान कसा आहे दोन्ही संघांचा हेड-टू-हेड रेकॉर्ड ? जाणून घ्या.

**कसा आहे दोन्ही संघांचा हेड-टू-हेड रेकॉर्ड ?**

भारत आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधील बलाढ्य संघ आहेत. त्यामुळे कोणताही संघ सहजपणे विजय मिळवू शकणार नाही, हे तर निश्चित आहे. मात्र वन डे क्रिकेटमधील दोन्ही संघांचे कामगिरी पाहिली तर दोन्ही संघ ३४ वेळा आमने सामने आले आहेत. या दरम्यान भारतीय संघाने २० सामने जिंकले आहेत, तर दक्षिण आफ्रिकेला अवघ्या तेरा सामन्यांत विजय मिळविता आला आहे.

साखळी फेरीत भारतीय संघाची कामगिरी

या स्पर्धेत भारतीय संघाने पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून दमदार सुरुवात केली होती. त्यानंतर पाकिस्तानचा एकतर्फी पराभव केला. सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये दमदार विजय मिळविल्यानंतर भारताला पुढील तिन्ही सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया या संघांनी भारतीय संघाला पराभूत केले. पण त्यानंतर निर्णय सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडला पराभूत केले आणि सेमी फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले. दरम्यान साखळी फेरीतील शेवटचा सामना पावसामुळे रद्द झाला. त्यानंतर सेमी फायनलमध्ये भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला पराभूत करून अंतिम फेरीत स्थान निश्चित केले.




### दोन्ही संघांकडे पहिल्यांदाच वर्ल्ड कप जिंकण्याची संधी

भारतीय संघाने तिसऱ्यांदा महिला वन डे वर्ल्ड कप स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या आधी २००५ आणि २०१७ मध्ये झालेल्या वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम फेरीत भारतीय संघाने प्रवेश मिळविला होता. मात्र दोन्ही वेळेस भारताला पराभवाचा सामना करावा लागला, तर दक्षिण आफ्रिकेने पहिल्यांदाच या स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या दोन्ही संघांना आजवर एकदाही वर्ल्डकपची ट्रॉफी जिंकता आलेला नाही. त्यामुळे दोन्ही संघांकडे इतिहास रचण्याची संधी आहे.

### या स्पर्धेसाठी असे आहेत दोन्ही संघ

**भारत :** हरमनप्रीत कौर, स्मृती मानधना, हरलीन देओल, जेमिमा रॉड्रिग्ज, रिचा घोष, रेणुकासिंग ठाकूर, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, क्रांती गौड, श्री चरणी, राधा यादव, अमंजोत कौर, अरुंधती रेड्डी, उमा छेत्री, शफाली वर्मा.

**दक्षिण आफ्रिका :** लॉरा वॉल्वार्डट, आयाबोंगा खाका, क्लो ट्रायॉन, नदिन डी क्लार्क, मारिझान कप्प, तेझमिन ब्रिट्स, सिनालो जाफ्ता, नॉनकुलुलेको म्लाबा, ॲनिएरी डर्कसेन, ॲनिके बॉश, मासाबाता क्लास, सुने लूस, कराबो मेसो, तुम्ही सेखुखुने, नॉन्ड्युमिसो शंगासे.



## जेव्हा धोनीने जेमी रॉड्रिग्जला विचारले होते बॅटचे वजन; म्हणाला, " तू तर माझ्यापेक्षा..."

जेमिमा रॉड्रिग्जने काही काळापूर्वी दिलेल्या मुलाखतीत महेंद्रसिंह धोनीशी झालेल्या भेटीचा प्रसंग सांगितला आहे. भारतीय क्रिकेटमधल्या सर्वकालिक महान कर्णधारांच्या रांगेतील सर्वांत उठून दिसणारे नाव म्हणजे कॅप्टन कूल महेंद्रसिंह धोनी. धोनीचे क्रिकेटमधले वर्चस्व आणि त्याच्या स्वभावातील साधेपणा याची नेहमीच चर्चा होते. आता महिला क्रिकेट विश्वचषकात सेमी फायनलमध्ये आपल्या शतकाच्या जोरावर टीम इंडियाचा विजय साकार करून देणारी जेमिमा रॉड्रिग्ज हिच्या धोनीशी झालेल्या भेटीची चर्चा होऊ लागली आहे.

जेमिमा रॉड्रिग्जने काही वर्षांपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीमध्ये तिने स्वतःच हा प्रसंग सांगितला होता. त्या मुलाखतीमधील व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

काय म्हणतेय जेमिमा रॉड्रिग्ज व्हिडिओमध्ये ?

जेमिमाने या व्हिडिओमध्ये कॅप्टन कूल महेंद्रसिंह धोनीशी झालेल्या तिच्या भेटीबाबत सांगितले आहे. धोनीने आपल्याला बॅटचे वजन विचारल्याचे ती म्हणाली. " मी धोनीला अनेकदा भेटले आहे. त्याने एकदा मला विचारले, की ' तुझ्या बॅटचे वजन किती आहे ?' मी म्हटले, १२०० ग्रॅम. तर तो म्हणाला ' तू तर माझ्या बॅटपेक्षाही जड बॅट वापरतेस '. तेव्हा आम्ही एका कार्यक्रमात होतो. तेथे पुरुष क्रिकेट संघ आणि महिला क्रिकेट संघ एकत्र होते ", असे जेमिमा यावेळी म्हणाली.

जेमिमाने यावेळी बोलताना धोनीच्या स्वभाववैशिष्ट्याचे कौतुक केले. " तो खूप विनयशील आहे. त्याचे एक वेगळेच वलय आहे. एकदा न्यूझीलंडमध्ये आम्ही रात्रीचे जेवण करत होतो. युजवेंद्र चहलही आमच्यासोबत होता. धोनी त्या ठिकाणी दाखल झाला. आम्हाला लगेच सगळे वातावरण बदलल्याचे जाणवले. त्याच्यासोबत त्याचे एक प्रकारचे वलय असते. पण त्याच्या स्वभावात कमालीचा साधेपणा आहे. तुम्ही त्याच्याशी बोलताना तुम्हाला अजिबात असे वाटत नाही, की तुम्ही इतक्या मोठ्या व्यक्तीशी बोलत आहात. तो सगळ्यांशी आपुलकीने बोलतो ", असे जेमिमा या व्हिडिओमध्ये सांगताना दिसत आहे.

जेमिमा रॉड्रिग्जच्या शतकामुळे भारताचा विजय साकार दरम्यान गुरुवारी झालेल्या महिला विश्वचषक उपांत्य सामन्यात जेमिमा रॉड्रिग्जने केलेल्या अविस्मरणीय खेळीच्या जोरावर भारतीय संघाने बलाढ्य ऑस्ट्रेलियाला चारीमुंड्या चीत केले. ऑस्ट्रेलियाने विजयासाठी दिलेले ३३९ धावांचे आव्हान भारताने ५ विकेट्स आणि ९ चेंडू शिल्लक राखून पार केले. यामध्ये जेमिमा रॉड्रिग्जने केलेल्या नाबाद १२३ धावांचा समावेश होता विशेष म्हणजे समोरच्या बाजूने फलंदाज ठराविक अंतराने बाद होत असताना जेमिमा मात्र संघाला विजय मिळवून देईपर्यंत खेळपट्टीवर ठाण मांडून बसली होती. कर्णधार हरमनप्रीत कौरसोबत जेमिमाने केलेल्या १६७ धावांच्या भागीदारीच्या जोरावरच भारताने ३३९ धावांचे अशक्यप्राय वाटणारे आव्हान पार करून दाखवले. आता रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी अंतिम सामन्यात भारताची गाठ दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाशी पडणार आहे.

## रोहितकडून ऑस्ट्रेलियाला हरवण्याचा प्लॅन ?

### स्मृती अन् जेमिमासोबतचा व्हिडिओ आला समोर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताने आयसीसी वुमेन्स क्रिकेट वर्ल्ड कप २०२५ च्या सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय मिळवून फायनलमध्ये प्रवेश केला आहे. या विजयासह भारताने तिसऱ्यांदा वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. आता त्यांचा सामना फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. अशातच आता टीम इंडियाचा माजी वनडे कॅप्टन रोहित शर्मा याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. वनडे वर्ल्ड कप जिंकणे माझे स्वप्न- रोहित शर्मा व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये रोहित शर्मा वुमेन्स क्रिकेटरसोबत गप्पा मारतोय. वनडे वर्ल्ड कप जिंकणे हे माझे स्वप्न आहे. मेन्स आणि वुमेन्स टीममध्ये एक टीम कॉमन आहे, की आयसीसी नॉक आऊट मॅचमध्ये आपल्या टीम हारत आहेत. मेन्स टीम सेमीफायनलमध्ये हारते आहे आणि तुमची टीम फायनलमध्ये हारत आहे. २०१७ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आम्ही फायनलमध्ये हारलो. त्यावेळी त्या लीगमध्ये आम्ही एकही मॅच गमाविली नव्हती. त्यानंतर २०१९ च्या वर्ल्ड कपमध्ये इंग्लंडविरुद्ध आम्ही मॅच हारलो. त्यानंतर एकही मॅच गमावली नाही. मात्र, सेमीफायनलला हारलो, असे रोहित शर्मा या व्हिडीओमध्ये सांगताना दिसत आहे. एकमेकांना आव्हान केले पाहिजे फायनलच्या आधी आपल्याला चांगली तयारी करावी लागणार आहे. दोन्ही टीमला फायनलच्या आधी एकमेकांना मदत केली पाहिजे. मेन्स टीमने वुमेन्स टीमला आणि वुमेन्स टीमने मेन्स टीमला आव्हान केले पाहिजे, असे रोहित शर्मा म्हणाला. त्यामुळे एकमेकांच्या चुका समजतील, असेही रोहित शर्मा म्हणताना दिसतोय. हिटमॅन, स्मृती मानधना आणि जेमिमाचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. तसेच रोहित शर्माने वुमेन्स टीमला स्क्रिप्ट लिहून दिली, असा दावा केला जात आहे.

तिसरी वर्ल्ड चॅम्पियन टीम कोणती ? दरम्यान, यंदा महिला क्रिकेटला नवा वर्ल्ड कप विनर मिळणार आहे. इतिहासात पहिल्यांदाच महिला वर्ल्ड कपच्या अंतिम फेरीत ना ऑस्ट्रेलिया, ना इंग्लंड आहे. त्यामुळे तिसरी वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान साऊथ अफ्रिका आणि भारताकडे आहे.

### वुमेन्स टीमचे कौतुक



हा व्हिडीओ चार पाच वर्ष जुना असल्याची माहिती आहे. रोहित शर्माने असा कोणताही सल्ला सेमीफानयल मॅचपूर्वी दिला नव्हता. रोहित शर्मा अनेकदा वुमेन्स टीमला सल्ला देताना दिसतो. मुंबई इंडियन्सच्या वुमेन्स खेळाडूंसोबत अनेकदा क्रिकेटविषयी चर्चा देखील होते. टीम इंडियाने सामना जिंकल्यानंतर इन्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. त्यात रोहित शर्माने एका वाक्यात कौतुक केले. वेल डन टीम इंडिया, असे रोहितने इन्टाग्राम स्टोरीवर लिहिले होते. त्यावेळी त्याने टीम इंडियाचा फोटो देखील स्टोरीवर शेअर केला होता.

## टीम इंडियाला फायनलमध्ये पोहोचविणारा पडद्यामागचा शिलेदार अमोल मुजुमदार ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महिला वन डे वर्ल्डकप २०२५ च्या फायनलमध्ये भारतीय संघाने धडक मारली आहे. रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी दक्षिण आफ्रिका आणि भारत यांच्यामध्ये हा सामना पार पडणार आहे. भारतीय महिला संघाने सेमी फायनल सामन्यात बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा पराभव केला होता. भारताची स्पर्धेतील कामगिरी पाहिली तर साखळी फेरीमध्ये झालेल्या सलग पराभवामुळे रस्ता बिकट वाटत होता. मात्र भारताच्या वाघिणींनी कमाल दाखविली आहे.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचे मोठे योगदान आहे. अमोल मुजुमदार यांनी कधीही भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले नसले, तरी त्यांनी आपल्या शांत नेतृत्त्वशैलीने आणि खेळाडूंमध्ये विश्वास निर्माण करून संघाला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचविले आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी संघात स्थिरता आणली आणि निवड व नेतृत्त्वावर उठलेल्या प्रश्नांना आपल्या कामातून उत्तर दिले. मुजुमदार यांची कार्यपद्धती दिखाऊ नाही. त्यांच्या नियुक्तीवर काही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. परंतु मुजुमदार यांनी आपल्या कृतीतून हे सिद्ध केले. मुजुमदार यांची प्रशिक्षणाची पद्धत पारंपरिक प्रशिक्षकांपेक्षा वेगळी आहे. ते मोठे भाषण किंवा भावनिक गोष्टींवर जोर देत नाहीत, तर खेळाडूंना शांतपणे आपले सर्वोत्तम प्रदर्शन करण्यासाठी प्रेरित करतात. त्यांची सर्वांत मोठी ताकद म्हणजे खेळाडूंमध्ये विश्वास निर्माण करणे. विश्वचषकादरम्यान जेव्हा संघाला ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या मजबूत संघांकडून पराभव स्वीकारावा लागला तेव्हाही मुजुमदार यांनी ड्रेसिंग रूममध्ये शांतता राखली. अमोल मुजुमदार यांनी आंतरराष्ट्रीय सामना खेळला नसला, तरी त्यांनी १७१ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ११ हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. त्यांच्या नावावर ३० शतके आणि ६० अर्धशतके आहेत. लिस्ट ए मध्ये मुजुमदार यांनी ११३ सामन्यांमध्ये ३ हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. त्यांच्या नावावर ३ शतके आणि २६ अर्धशतके आहेत. तसेच त्यांनी १४ टी २० सामन्यांमध्ये १७४ धावा केल्या आहेत.

## स्मृती मानधना, सांगलीची कन्या, टीम इंडियाची शान!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात आयसीसी महिला वन डे वर्ल्डकप २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. भारतीय संघाने या स्पर्धेतील सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे. भारतीय संघ पहिली विजेतेपदाची ट्रॉफी उंचावण्यापासून एक पाऊल दूर आहे. भारतीय संघासाठी डावाची सुरूवात करणाऱ्या स्मृती मानधनाची तुलना माजी फलंदाज मिताली राजसोबत केली जाते. याच वर्ल्डकप स्पर्धेत तिने भारतासाठी वन डे क्रिकेटमध्ये सर्वांत जलद शतक झळकावण्याचा विक्रम आपल्या नावावर केला. दरम्यान, स्मृती मानधनाचा क्रिकेट प्रवास कसा सुरू झाला ? जाणून घ्या.

सांगली एक्स्प्रेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्मृती मानधनाचा जन्म १८ जुलै १९९६ रोजी मुंबईत झाला. त्यानंतर तिचे कुटुंब सांगलीत स्थलांतरित झाले. क्रिकेटच्या पंढरीत जन्मलेल्या स्मृती मानधनाचा क्रिकेटचा प्रवास सांगलीत सुरू झाला. स्मृतीचे वडील श्रीनिवास हे देखील क्रिकेट खेळायचे. सांगलीत जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धांमध्ये त्यांनी आपल्या खेळाचा ठसा उमटवला. भाऊ श्रावण देखील क्रिकेट खेळायचा. लहानपणापासूनच स्मृतीवर क्रिकेटचे संस्कार होत होते. त्यामुळे तिला देखील क्रिकेट खेळायची आवड निर्माण झाली. डावखुऱ्या हाताची फलंदाज असलेल्या स्मृतीला वयाच्या नवव्या वर्षी महाराष्ट्राच्या १५ वर्षांखालील संघाकडून खेळण्याची संधी मिळाली. त्यानंतर तिला महाराष्ट्राकडून १९ वर्षांखालील संघाचं प्रतिनिधित्व करण्याची संधी देखील मिळाली. २०१३ मध्ये तिला भारतीय संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली. वयाच्या १६ व्या वर्षी पदार्पण करणाऱ्या स्मृतीने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात ३९ धावांची दमदार खेळी केली. काही दिवसांनंतर तिला वन डे क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली.

**राहुल द्रविडच्या स्वाक्षरीच्या बॅटने झळकावले द्विशतक**

स्मृतीने राहुल द्रविड यांची स्वाक्षरी असलेल्या बॅटने १९ वर्षांखालील एकदिवसीय सामन्यात दमदार द्विशतकी खेळी केली होती. यासह ५० षटकांच्या क्रिकेटमध्ये द्विशतकी खेळी करणारी ती पहिलीच भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली. २०१४ मध्ये तिला भारतीय कसोटी संघात पदार्पण करण्याची संधी मिळाली. एकदिवसीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतक झळकावून तिने आपला दर्जा आणखी मजबूत केला.

भारतीय संघाने २०१७ मध्ये झालेल्या महिला विश्वचषक स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला होता. या स्पर्धेतील अंतिम फेरीत पोहोचविण्यात स्मृतीने मोलाची भूमिका बजावली होती. २०१८ मध्ये तिला आयसीसी महिला क्रिकेटपटू ऑफ द इअर आणि एकदिवसीय क्रिकेटर ऑफ द इअर हा पुरस्कार मिळाला. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने आजवर एकही ट्रॉफी जिंकली नव्हती. पण वूमेन्स प्रीमिअर लीग स्पर्धेत तिने रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाचे प्रतिनिधित्व करताना पहिली ट्रॉफी जिंकून दिली. आता स्मृतीला खेळताना पाहून महिला गावातील महिला क्रिकेटपटूंनाही प्रेरणा आणि ऊर्जा मिळते. लाखो लोकांसाठी आदर्श म्हणून तिने क्रिकेटपटूंच्या नवीन पिढीला प्रेरणा दिली आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# २०१७ मधील ‘फॅनगर्ल’ ते २०२५ ची ‘फिनिशर’!

## जेमिमाने ज्या हरमनला पाहून बॅट हातात घेतली तिच्याच साथीने बनली विजयाची शिल्पकार...!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाचा पराभव सहसा होत नाही. महिला क्रिकेटमध्ये तर तो जवळजवळ अपवादात्मकच असतो. मात्र, २०१७ मध्ये भारताने काहीतरी असे करून दाखवले, ज्यामुळे संपूर्ण जग अचंबित झाले होते. २०१७ च्या महिला एकदिवसीय विश्वचषक उपांत्य फेरीत, ब्रिस्टल येथे, भारताने ऑस्ट्रेलियाची सलग २६ सामन्यांची विजयी मालिका मोडीत काढली होती. त्या दिवशी हरमनप्रीत कौरने साकारलेली १७१ धावांची ऐतिहासिक खेळी भारतीय क्रिकेटच्या इतिहासात कायमस्वरूपी कोरली गेली. त्याच दिवशी, मुंबईत, १६ वर्षाची जेमिमा रॉड्रिग्स टीव्हीसमोर बसून ती मॅच पाहत होती. खरेतर ती सुरुवातीला हॉकीची राष्ट्रीय खेळाडू होती. मात्र, तिने हॉकी सोडून क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला होता. २०१७ मधील त्या सामन्यात हरमनने जेव्हा ऑस्ट्रेलियन फिरकी गोलंदाजांवर षटकार ठोकला, तेव्हा जेमिमाच्या मनात काहीतरी पेटून उठले. जसे १९८३ च्या कपिल देवच्या संघाने सचिन तेंडुलकरला प्रेरित केले. तसेच २०१७ मध्ये हरमनप्रीतच्या खेळीने जेमिमाला एक स्वप्न दिले. जेमिमाने मनोमन निश्चय केला, की ‘ एक दिवस मीसुद्धा अशीच कामगिरी करून दाखवेल.’

**२०१७ मध्ये केले होते भारतीय संघाचे स्वागत**

काही दिवसांनंतर, मुंबई विमानतळावर तीच जेमिमा तिरंगा फडकावत ‘टीम इंडिया’चे स्वागत करत होती. भारत लॉर्ड्सवर अंतिम सामना हरला असला तरी, जेमिमाच्या दृष्टीने ते अजिबात पराभूत झाले नव्हते. त्यांनी भारतीय क्रिकेटमध्ये एक नवी ज्योत प्रज्वलित केली होती. बॅट हातात घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक मुलीला प्रेरणा दिली.

**ऑस्ट्रेलियाचा प्रतिशोध आणि जेमिमाचे आव्हान**

२०१७ चा तो उपांत्य सामना केवळ भारतासाठी अभिमानास्पद नव्हता, तर ऑस्ट्रेलियासाठीही तो एक महत्त्वाचा टप्पा ठरला. पराभवानंतर त्यांनी स्वतःला आणखी मजबूत केले. त्यांनी पुढे २०२२ चा विश्वचषक सहज जिंकला. त्यानंतर ते २०२५ पर्यंत या स्पर्धेत सलग १५ सामने जिंकून अजिंक्य राहिले होते. मात्र, इतिहासाची पुनरावृत्ती होणार होती. २०१७ मध्ये हरमनने चमत्कार केला. २०२५ मध्ये तीच कहाणी जेमिमाने पुन्हा लिहिली.

**हरमनप्रीत काय म्हणाली?**

सामन्यानंतर हरमनप्रीत म्हणाली, की ‘आम्ही एकमेकींना खूप चांगली साथ दिली. सतत संवाद साधत होतो. जेमिमा मला प्रत्येक ओव्हरनंतर आपण किती धावा केल्या आहेत आणि पुढे किती पाहिजेत हे सांगत होती. ती स्वतःला व मलासुद्धा प्रोत्साहन देत होती. जेमिमाने स्वतःला ज्या प्रकारे सांभाळले, त्याचे बरेचसे श्रेय हे तिलाच जाते.’ हरमनप्रीत ८९ धावांवर बाद झाली, तेव्हा भारताला विजयासाठी आणखी ११३ धावांची गरज होती. यानंतर संपूर्ण जबाबदारी जेमिमाच्या खांद्यावर होती आणि तिने मागे वळून पाहिले नाही.



### ‘हॅरी दी’ सोबत जेमिमाची अभेद्य जोडी

नवी मुंबई येथे गुरुवारी झालेल्या महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ च्या उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलिया पुन्हा एकदा प्रबळ दावेदार होते. त्यांनी गट साखळीत भारताविरुद्धचे ३३१ धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पार केले होते. यावेळी काहीतरी असामान्य घडले. जी मुलगी एकेकाळी विमानतळावर ध्वज फडकावत होती, ती आता बॅट घेऊन उभी होती. २५ वर्षीय जेमिमा रॉड्रिग्सने नाबाद १२७ धावांची स्फोटक खेळी करुन ऑस्ट्रेलियाला स्पर्धेतून बाहेर काढले. भारताला अंतिम फेरीत पोहोचवले. २०१७ मध्ये हरमनप्रीतला डोळ्यासमोर ठेवून जेमिमाने स्वप्न पाहिले. मुंबईच्या मुलीला आता मैदानावर हरमनप्रीत सोबत क्रीजवर उभी राहिली. ऑस्ट्रेलियाने ३३८ धावांचा डोंगर उभारला होता. शेफाली वर्मा, स्मृती मानधना लवकर बाद झाल्या आणि सगळ्यांना वाटले आता स्वप्न भंगले. मात्र, जेमिमा आणि हरमनप्रीतने एकत्र येऊन चमत्कार घडवला. या दोघींनी १६७ धावांची विक्रमी भागीदारी रचली. जी विश्वचषक इतिहासात ऑस्ट्रेलियाविरुद्धची सर्वात मोठी भागीदारी ठरली.

### थकलेली, पण निश्चयी योद्धी

रॉड्रिग्सने १२७ धावांपैकी ७१ धावा धावून काढल्या. तिने आपल्या खेळीत एकही षटकार मारला नाही. ती स्वतःसाठी आणि आपल्या पार्टनरसाठी धावत होती. जेव्हा अमनजोत कौरने ४९ व्या ओव्हरमध्ये विजयी चौकार मारला, तेव्हा जेमिमा पिचच्या मध्यभागी गुडघ्यांवर खाली बसली. अश्रू, विजयाचा आनंद आणि एक पूर्ण झालेले स्वप्न, हे सर्व तिच्या मनात एकाच वेळी दाटून आले होते. मानसिक लढा आणि आत्मविश्वासाची पुनर्प्राप्ती या विश्वचषकात जेमिमाने केवळ गोलंदाजांशी नाही, तर आपल्या आतल्या भीतीशीही लढा दिला. तिला मिताली राजची उत्तराधिकारी मानले जात होते. मात्र, सुरुवातीच्या अपयशानंतर तिला इंग्लंडविरुद्धच्या सामन्यातून वगळण्यात आले. ती रात्रभर फोनवर आपल्या आईशी बोलत असे, रडत असे, स्वतःवर शंका घेत असे, पण तिने हार मानली नाही. ती पुन्हा मैदानात उतरली आणि न्यूझीलंडविरुद्ध ७० धावांची खेळी करून परतली. येथूनच तिच्या पुनरागमनाची कहाणी सुरू झाली.

‘सिद्ध करण्यासाठी नाही, तर संघासाठी खेळायचे’ सामन्यानंतर जेमिमा म्हणाली, ‘जेव्हा मला मागील विश्वचषकातून वगळण्यात आले, तेव्हा मी निश्चय केला की, आता मी स्वतःला सिद्ध करण्यासाठी नाही, तर संघाला जिंकवण्यासाठी खेळणार. कारण स्वतःला सिद्ध करण्याची मानसिकता कधीच मदत करत नाही.’ तिची ही ओळ अपयशाशी झगडणाऱ्या प्रत्येक खेळाडूसाठी एक प्रेरणादायी संदेश आहे. ‘रील्स क्वीन’ पासून ‘रन मशीन’ पर्यंत जेमिमाचे करिअर एका रोलर कोस्टरसारखे राहिले आहे. २०१८ मध्ये जेव्हा ती पहिल्यांदा प्रकाशात आली, तेव्हा सगळे म्हणाले, की ‘नेक्स्ट बिग थिंग’. पण वेळेनुसार टीकाही झाली. लोक म्हणू लागले, ‘ती क्रिकेटर कमी, सोशल मीडिया स्टार जास्त आहे.’ तिची प्रत्येक रील, प्रत्येक गाणे टीकेचे धनी बनले. मात्र, जेमिमाने उत्तर बॅटने दिले. तिने स्वतःला पुन्हा घडवले. मेहनत, आत्मविश्वास आणि श्रद्धेच्या बळावर ती उभी राहिली. २०२५ मध्ये पहिले एकदिवसीय शतक ठोकण्यासाठी तिने किती छान प्लॅटफॉर्म निवडला आणि हाच तिच्या आयुष्याचा टर्निंग पॉईंट ठरला.

# ५०० मुलांमध्ये मी एकटी मुलगी खेळायचे, आता तेथे मुलींसाठी स्वतंत्र नेट असते

## जेमिमा रॉड्रिग्ज – नासिर हुसेन यांच्यात महिला क्रिकेटमधील बदलाची चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



‘ ५०० मुलांमध्ये मी एकटी मुलगी सराव करायचे. आता तेथे मुलींसाठी स्वतंत्र नेट असते ’, अशा शब्दांत जेमिमा रॉड्रिग्जने महिला क्रिकेटमध्ये झालेल्या बदलासंदर्भात भाष्ट केले होते. स्काय स्पोर्टस वाहिनीसाठी इंग्लंडचे माजी कर्णधार आणि समालोचक नासिर हुसेन यांच्याशी बोलताना जेमिमाने आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या.

तू खेळायला सुरूवात केलीस त्याच्या तुलनेत आता महिला क्रिकेटपटूंसाठी परिस्थिती सुधारली आहे, असे म्हणता येईल का? असे नासिर हुसेन यांनी विचारले. त्यावर ती म्हणाली, ‘ शंभर टक्के. अलीकडेच मी शाळेत (सेंट जोसेफ) गेले होते. जेव्हाही मी मुंबईत असते. थोडा वेळ असतो तेव्हा मी तेथे जाण्याचा प्रयत्न करते. कारण माझा प्रवास तेथून सुरू झाला. शाळा, शिक्षक, बाकी स्टाफ यांच्या पाठिंब्यामुळेच येथवर पोहोचू शकले आहे. अनेक मुली आता तेथे खेळत असतात. ते पाहून खूप आनंद होतो, समाधान वाटते. तेथे असलेला प्रत्येक जण क्रिकेटचा चाहता आहे. आता ते वूमन्स क्रिकेट फॉलो करतात.

‘ मी ज्या क्लबमधून खेळायचे तेथे आता असंख्य मुली खेळतात. मी सुरूवात केली त्यावेळी ५०० मुलांमध्ये मी एकटीच मुलगी खेळत असायचे. आता तेथे मुलींसाठी स्वतंत्र नेट असते. हा खूप मोठा बदल आहे. त्या अतिशय स्पर्धात्मक आणि व्यावसायिक पातळीवर खेळतात. त्यांचा संघ आहे. महिला क्रिकेटमध्ये खूप बदल झाले आहेत. वूमन्स प्रीमिअर लीग, द हंड्रेड, बिग बॅश चाहते या स्पर्धा पाहतात. त्यांचा पाठिंबा मोलाचा आहे ’. अशा शब्दांत जेमिमाने आपल्या भावना व्यक्त केल्या.जेमिमा ही भविष्यातली भारताची स्टार खेळाडू असेल, असे भाकीत नासिर हुसेन यांनी २०१८ मध्येच वर्तविले होते. हुसेन यांचा विश्वास जेमिमाने सार्थ ठरवला आहे.

सेमी फायनलच्या दडपणाच्या लढतीत जेमिमाने ऑस्ट्रेलियासारख्या तुल्यबळ प्रतिस्पर्ध्याविरुद्ध जेमिमाने शतकी खेळीसह संघाला दिमाखदार विजय मिळवून दिला. जेमिमासाठी वर्ल्डकपची सुरूवात चांगली झाली नव्हती. श्रीलंकेविरुद्धच्या लढतीत तिला भोपळाही फोडता आला नाही. पाकिस्तानविरुद्ध तिने ३२ धावांची छोटेखानी खेळी केली. दक्षिण आफ्रिकेविरुद्धही तिला खाते उघडता आले नाही. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या प्राथमिक फेरीच्या सामन्यात तिने ३३ धावा केल्या. इंग्लंडविरुद्ध तिला संघातून वगळण्यात आले. न्यूझीलंडविरुद्ध तिने नाबाद ७६ धावांची खणखणीत खेळी साकारली. बांगलादेशविरुद्ध तिला फलंदाजीला यावेच लागले नाही.

# बेड्यांसह दुसरा फरार गुन्हेगार दोंडाईचात जेरबंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एलसीबी पोलिसांच्या तावडीतून बेड्यांसह फरार झालेल्या दोन गुन्हेगारांपैकी एकाला दिल्लीत अटक करण्यात आली होती. त्यानंतर दुसरा फरार असलेल्या गुन्हेगारास दोंडाईचा येथून एलसीबीच्या पथकाने अटक केली आहे. काही दिवसांपूर्वी जळगाव येथून अमळनेरकडे पोलीस चौकशीसाठी दोन आरोपींना एलसीबीचे पथक अमळनेर येथे आणत होते. सुमारे साडेअकरा वाजता कुऱ्हे गावाजवळ सती माता मंदिराच्या अंडरपासमध्ये वाहनाचा वेग कमी होताच, दोन गुन्हेगार बेड्यांसह पसार झाले होते. या घटनेनंतर पोलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी चार पोलिसांना निलंबित केले होते. फरार झालेला एक आरोपी अमजद फकिरा कुरेशी (रा. मेहरुण, जळगाव) याला दिल्ली येथून अटक करण्यात आली होती. तसेच दुसरा फरार आरोपी शाकीर शाह अरमान शाह (वय २४, रा. सुप्रीम कॉलनी, जळगाव) याचा तांत्रिक मुद्यांच्या आधारे पोलिसांनी शोध घेतला. शाकीर शाह हा राजस्थान येथील अजमेर दर्ग्यावर असल्याचे समजले. मात्र, तेथून त्याने पलायन केले. नंतर त्याचे लोकेशन धुळे जिल्ह्यात दोंडाईचा येथे दिसत होते. त्याला पोलिसांनी दोंडाईचा येथे अटक केली आहे. एलसीबी पोलिसांनी त्याला अमळनेर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

# ज्येष्ठ पत्रकार दिलीप तिवारी यांना पीच. डी. प्रदान

## ‘कृषी नवतंत्र आणि बहुमाध्यमे वापरामुळे जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादकांचे जीवनमान बदलले’ हा संशोधन प्रबंधाचा निष्कर्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दिलीप तिवारी यांना पीएच. डी. पदवी प्रदान विषयी पत्र देताना कबचौउमविचे कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी, सोबत डाविकडून डॉ. सोमनाथ वडनेरे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, मार्गदर्शक प्रा. डॉ. सुधीर भटकर, सुभाष तळेले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठातर्फे जळगाव येथील ज्येष्ठ पत्रकार दिलीप मनोरमा केशवलाल तिवारी यांना पीएच. डी. पदवी (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी अर्थात विद्यावाचस्पती) प्रदान करण्याचे पत्र (नोटीफिकेशन) आज प्रदान करण्यात आले. विद्यापिठाचे कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते श्री. तिवारी यांना याबाबत अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी प्रकुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, मार्गदर्शक प्रा. डॉ. सुधीर भटकर, संशोधन विभागाचे सहायक कुलसचिव प्रविण चंदनकर, डॉ. सोमनाथ वडनेरे, सुभाष तळेले उपस्थित होते. कबचौउमवितील आंतर विद्याशाखेत जनसंवाद व पत्रकारिता विभागामार्फत श्री. तिवारी यांनी सादर केलेल्या ८५० पानांच्या प्रदीर्घ संशोधन प्रबंधास विद्यापिठाने स्वीकृती दिली आहे. श्री. तिवारी यांचा संशोधन प्रबंधाचा विषय जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जीवनमानात नवतंत्र आणि बहुमाध्यम वापरामुळे कसे बदलले ? हे ठळक निष्कर्षांमधून समोर आणतो. संशोधन प्रबंधाचा विषय ‘बहुमाध्यमांतून प्रसारित कृषी नवतंत्रज्ञान विषयक माहितीचे केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनमानावर झालेल्या परिणामांचे विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भ : जळगाव जिल्हा)’ हा आहे. जळगाव जिल्ह्यातील केळी लागवड, केळी लागवडीत नवतंत्र वापर, केळी उत्पादकांकडून माहितीसाठी बहुमाध्यम वापर, केळी उत्पादन आणि उत्पन्नात वाढ, हातात जादा पैसा आल्यानंतर शेतकऱ्यांच्या जीवनमान – राहणीमानात बदल अशा मुख्य विषयांचा सविस्तर अभ्यास संशोधन कार्यात केला आहे. केळी लागवड करणारा शेतकरी कोणते माध्यम वापरतो, त्यातून कोणती माहिती घेतो, माहितीचा उपयोग केळी लागवडीत कसा होतो, उत्पादन कसे वाढते, उत्पन्न वाढल्यामुळे त्याचे जीवनमान कसे उंचावते या विषयी संशोधन प्रबंधात प्रश्नावली – मुलाखती आणि विश्लेषणाचे सविस्तर प्रकरण आहे. केळी उत्पादन वाढीसाठी नवतंत्र शोध, त्याचा शेत शिवारात प्रत्यक्ष वापर, प्रचार – प्रसार या कार्यात जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमीटेडचे योगदान याचाही सविस्तर आढावा संशोधन प्रबंधात घेतला आहे. सरकारी कृषी गणना किंवा सामान्य जनगणना या पुढे जावून श्री. तिवारी यांनी केळी उत्पादकांच्या कौटुंबिक – सामाजिक आयुष्याचा सांख्यिकी अभ्यास संशोधन प्रबंधात सादर केला आहे. सन १९८९ नंतर जिल्हयातील केळी उत्पादकांची आर्थिक – सामाजिक स्थिती दाखवणारे हे एकमेव व्यापक संशोधन आहे.




# श्रीकृष्ण-रुक्मिणी यांचा दैवी विवाह : तुळशी विवाह

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

द्वारकानाथ श्रीकृष्णांना दररोज रात्री झोपताना सांगायचे ती ही कथा आहे. द्वारकेत राहताना श्रीकृष्ण आणि बलराम यांची कीर्ती चहूकडे पसरली होती. त्यांच्यासमोर मोठमोठे राजे आणि सत्ताधीश नतमस्तक होऊ लागले होते. त्यांच्या गुणांचा गौरव सर्वत्र गायला जाऊ लागला. बलराम यांच्या बल वैभवाने प्रभावित होऊन रैवत नावाच्या राजाने आपली कन्या रेवती यांचा विवाह बलराम यांच्यासोबत लावला. बलराम हे श्रीकृष्णांपेक्षा वयाने मोठे होते. त्यामुळे प्रथम त्यांचा विवाह झाला.

**श्रीकृष्ण-रुक्मिणी यांचा दैवी विवाह**

विदर्भ देशात भीष्मक नावाचा तेजस्वी आणि सत्शील राजा राज्य करीत होता. त्याची राजधानी कुंडिनपूर येथे होती. त्यांना पाच पुत्र आणि एक कन्या रुक्मिणी होती. रुक्मिणीच्या सौंदर्यात लक्ष्मीप्रमाणे दैवी लक्षणे होती. लोक तिला ‘ लक्ष्मीस्वरूपा ’ म्हणत. रुक्मिणी जेव्हा विवाहयोग्य वयात आली तेव्हा भीष्मक यांना तिच्या विवाहाची चिंता सतावू लागली. रुक्मिणीकडे येणारे-जाणारे लोक श्रीकृष्ण यांच्या गुण, सौंदर्य आणि पराक्रमाची प्रशंसा करत. त्यांच्या या गौरवगाथांनी रुक्मिणी प्रभावित झाली आणि तिने मनोमन ठरविले, की ती श्रीकृष्ण यांच्याशिवाय कोणालाही पती म्हणून स्वीकारणार नाही. दुसरीकडे श्रीकृष्ण यांनाही रुक्मिणीच्या रूप आणि सुलक्षणांबद्दल माहिती मिळाली होती.

**रुक्मीचा द्वेष आणि शिशुपालाशी विवाह निश्चित**

भीष्मक यांचा मोठा पुत्र रुक्मी हा श्रीकृष्ण यांच्याशी वैर बाळगत होता. त्याला रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी करायचा होता. कारण शिशुपालही श्रीकृष्ण यांचा द्वेष करत होता. रुक्मीच्या इच्छेनुसार भीष्मक यांनी रुक्मिणीचा विवाह शिशुपालाशी निश्चित केला आणि विवाहाची तारीखही ठरली.

**रुक्मिणीचा श्रीकृष्णांकडे संदेश**



जेव्हा रुक्मिणीला आपला विवाह शिशुपालाशी निश्चित झाल्याचे समजले तेव्हा ती अत्यंत दुखी झाली. तिने आपला निश्चय श्रीकृष्ण यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी एका ब्राह्मणाला द्वारकेला पाठविले. तिचा संदेश असा होता, की हे नंदनंदन मी तुम्हालाच पती म्हणून स्वीकारले आहे. तुम्हाला सोडून मी दुसऱ्या कोणाशीही विवाह करू शकत नाही. पित्याने इच्छा नसताना माझा विवाह शिशुपालाशी निश्चित केला आहे. आमच्या कुलाची परंपरा आहे, की विवाहापूर्वी वधूला नगराबाहेरील गिरिजा मंदिरात दर्शनासाठी जावे लागते. मी विवाहाच्या वस्त्रात सजून गिरिजा मंदिरात येईन. तुम्ही तेथे येऊन मला पत्नी म्हणून स्वीकारावे. जर तुम्ही आला नाहीत, तर मी माझ्या प्राणांचा त्याग करेन.

**श्रीकृष्णांचा कुंडिनपूरकडे प्रवास**

रुक्मिणीचा संदेश मिळताच श्रीकृष्ण रथावर स्वार होऊन तातडीने कुंडिनपूरकडे निघाले. त्यांनी त्या ब्राह्मणालाही रथावर बसविले. ही बातमी बलराम यांना समजली तेव्हा ते चिंतित झाले. कारण श्रीकृष्ण एकटेच गेले होते. त्यामुळे बलराम यादव सेनेसह कुंडिनपूरकडे रवाना झाले.

**शिशुपालाची वरात आणि कुंडिनपूरमधील उत्सव**

भीष्मक यांनी शिशुपालला आधीच संदेश पाठविला होता. ठरलेल्या तारखेला शिशुपाल मोठ्या वरातीसह कुंडिनपूरला पोहोचला. ही वरात नव्हे, तर एकप्रकारे सैन्यच होते. यात जरासंध, पौंड्रक, शाल्व आणि वक्रनेत्र यांसारखे श्रीकृष्णद्वेषी राजे आपापल्या सैन्यासह सहभागी झाले होते. विवाहाचा दिवस होता. कुंडिनपूर बंदनवार आणि तोरणांनी सजले होते. मंगलवाद्ये वाजत होती. मंगलगीते गायिली जात होती. जेव्हा नगरवासींना श्रीकृष्ण आणि बलराम कुंडिनपूरला आल्याचे समजले तेव्हा ते आनंदित झाले. त्यांना वाटले, की रुक्मिणीचा विवाह जर श्रीकृष्ण यांच्याशी झाला तरच योग्य जोडीदार मिळेल.

**श्रीकृष्णाने केले रुक्मिणीचे हरण**

सायंकाळी रुक्मिणी विवाहाच्या वस्त्रात सजून, सहेली आणि अंगरक्षकांसह गिरिजा मंदिराकडे निघाली. ती मनातून उदास आणि चिंतित होती. कारण तिने पाठविलेला ब्राह्मण परत आलेला नव्हता. मंदिरात तिने माता गिरिजेची पूजा करताना प्रार्थना केली, की हे माते, तू विश्वाची माता आहेस. माझी इच्छा पूर्ण कर. मी श्रीकृष्णांशिवाय कोणाशीही विवाह करणार नाही. मंदिरातून बाहेर पडताच रुक्मिणीला तो ब्राह्मण दिसला. त्याने काही बोलले नसले, तरी त्याला पाहून रुक्मिणीला विश्वास बसला, की श्रीकृष्ण तिचा समर्पण स्वीकारतील. ती रथात बसणार इतक्यात श्रीकृष्ण विजेच्या वेगाने तेथे पोहोचले. त्यांनी रुक्मिणीचा हात पकडला आणि तिला आपल्या रथात बसवून द्वारकेकडे वेगाने निघाले.

**युद्ध आणि रुक्मीचा पराभव**

क्षणार्धात कुंडिनपूरमध्ये बातमी पसरली, की श्रीकृष्णांनी रुक्मिणीचे हरण करून तिला द्वारकेला नेले. शिशुपाल संतापला आणि त्याने आपले मित्र राजे आणि सैन्यासह श्रीकृष्णांचा पाठलाग केला. पण बलराम आणि यादव सैन्याने त्यांना अडविले. युद्धात यादवांनी शिशुपाल आणि त्याच्या मित्रांची सेना पराभूत केली. शिशुपाल आणि इतर राजे निराश होऊन परतले. रुक्मी क्रोधाने थरथरत श्रीकृष्णांचा पाठलाग करू लागला. त्याने शपथ घेतली, की तो श्रीकृष्णांना बंदी बनवूनच परत येईल, अन्यथा कुंडिनपूरला परतणार नाही. श्रीकृष्ण आणि रुक्मी यांच्यात तुंबळ युद्ध झाले. श्रीकृष्णांनी रुक्मीला पराभूत करून त्याला रथाला बांधले. मात्र बलरामांनी मध्यस्थी करून त्याला सोडविले आणि सांगितले, की रुक्मी आता आपला नातेवाईक आहे, त्याला असा दंड देणे योग्य नाही. रुक्मी आपल्या शपथेनुसार कुंडिनपूरला परतला नाही. त्याने नवीन नगर वसवून तेथे राहण्यास सुरूवात केली.

**श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाह आणि संतती**

श्रीकृष्णांनी रुक्मिणीला द्वारकेत आणून विधीवत विवाह केला. रुक्मिणी श्रीकृष्ण यांच्या पटराण्यांपैकी एक महत्त्वपूर्ण पत्नी होत्या. त्यांच्या प्रेम आणि भक्तीने श्रीकृष्ण प्रभावित होते. या दाम्पत्याला प्रद्युम्न (कामदेवाचा अवतार) यांच्यासह अनेक संतती झाल्या.

रुक्मिणी यांच्या संतती : पुत्र : प्रद्युम्न, चारुदेष्ण, सुदेष्ण, पराक्रमी, चारुदेह, सुचारू, चारूगुप्त, भद्रचारू, चारूचंद्र, विचारू, चारू.

कन्या : चारूमती.

# जय जय रघुवीर समर्थ...



## मना सज्जना...

परम स्नेही मित्र हो, ‘ मना सज्जना ’ या सदरातून आपल्या भेटीला येण्याचे भाग्य मला लाभले, ही केवळ सद्गुरू समर्थ कृपा समजतो. दासबोधाचे पारायण करताना वेळोवेळी मनाचे श्लोक भेटले. त्यांच्या वाचनाशिवाय पुढे जाणे झाले नाही. त्यातूनच पारायण पद्धती समजली. आकलनाच्या कक्षा रुंदावल्या. अर्थबोध झाला. हाती काहीतरी विलक्षण गवसले असे वाटले. अतीव आनंद झाला. या आनंदात आपल्यालाही सहभागी करून घ्यावे म्हणून हा लिहिण्याचा प्रपंच...

दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक यासारख्या अनेक रचना समर्थांनी केल्या आहेत, त्या काळातीत आहेत. त्यांचे महत्त्व गेल्या ३५० वर्षांत कणभरही कमी झालेले नाही. किंबहुना त्यांचे मार्गदर्शन संसारी व्यक्तींना अधिकच गरजेचे वाटायला लागले आहे. काळाच्या कसोटीवर ते खरेही उतरले आहे. भारतीय संतांच्या परंपरेतील अनेक संतांनी भक्तीबरोबरच प्रपंच नेटका करण्यासाठी मार्गदर्शन केले. ते व्यक्तींना संबोधून केले आहे. परंतु ‘ मनाचे श्लोक ’ ही काव्यरचना व्यक्तींना, समाजाला संबोधून आवाहन करीत नाही, तर या रचना व्यक्तीच्या मनाला संबोधून केलेल्या आहेत. म्हणून त्यांचे वेगळेपण आहे. मराठी साहित्यात ही अशी एकमेव साहित्यकृती असावी, असे म्हणायला हरकत नाही.

‘ मना सज्जना ’ हे संबोधन किती हळूवार आणि आपलेपणा दर्शविणारे आहे. कुणीतरी आपुलकीने, प्रेमाने ओथंबलेल्या हळूवार भाषेत हिताच्या चार गोष्टी सांगतो आहे. पाठीवर आधाराचा हात ठेवून बोलतो आहे, असे वाटावे अशा या अलौकिक रचना आहेत. ज्या मनाच्या तळाचा सहजपणे ठाव घेतात. वाचणारा आतल्या आत सहमत होत जातो. हा एक चमत्कारच म्हणावा. यात अवघे २०५ श्लोक आहेत. त्यात कोणतीही पुनरुक्ती नाही. ओघवते, हळूवारपणे एक-एक गाठ उकलून गुंता सोडवावा तसे मार्गदर्शन आहे. वाचणाऱ्यांच्या मनातील वादळ, आवर्त शांत होऊन लख्ख प्रकाश पडावा तशी विलक्षण अनुभूती येते. यांच्या पठणाने निश्चितच उद्धार होईल, असे आश्वासित समर्थ वचनच आहे. यातील शेवटचे श्लोक तसे वचन देतात.

**मनाची शते ऐकता दोष जाती ।**
**मतिमंद ते साधना योग्य होती ।**
**चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी ।**
**म्हणे दास विश्वासता मुक्ती भोगी ।**

**- भाऊसाहेब देशमुख**
**मो. : 94203 89541**

(दर रविवारी वाचा.)

# कार्तिकी तथा प्रबोधिनी एकादशी : जागृतीचा दिवस, भक्तीचा उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कार्तिक शुक्लु एकादशी. ज्याला प्रबोधिनी एकादशी किंवा देवउठणी एकादशी असेही म्हणतात. ही हिंदू पंचांगातील अत्यंत पवित्र तिथी मानली जाते. चार महिन्यांच्या ‘ चातुर्मास ’ कालावधीनंतर भगवान विष्णू या दिवशी योगनिद्रेतील जागृती करतात, अशी श्रद्धा आहे. म्हणूनच या दिवशी देवजागरणाचा, धर्मजागरणाचा आणि आध्यात्मिक जागृतीचा उत्सव साजरा केला जातो.

**देवउठणीचे महत्त्व :** आषाढ शुद्ध एकादशीच्या दिवशी भगवान विष्णू ‘ शयन ’ करतात आणि कार्तिकी एकादशीला ‘ प्रबोधन ’ म्हणजेच जागृती होते. या चार महिन्यांमध्ये व्रत, नियम, साधना, दान, जप, तप, पूजा या सर्वांचे विशेष महत्त्व असते. प्रबोधिनी एकादशीने या कालावधीचा समारोप होतो. या दिवशी विवाह, गृहप्रवेश, धार्मिक विधी आदी शुभकार्यांना पुन्हा प्रारंभ केला जातो.

**उपवास आणि पूजा विधी :** या दिवशी भक्तजन उपवास करतात. तुळशी वृंदावन सजवतात आणि देवउठणीची पूजा करतात. काही ठिकाणी ‘ तुळशी विवाह ’ उत्सवही मोठ्या भक्तिभावाने साजरा होतो. भगवान विष्णू आणि तुळशी मातेच्या प्रतीकात्मक विवाहाने जीवनातील पवित्रतेचा संदेश दिला जातो. सायंकाळी दीपप्रज्वलन, भजन, कीर्तन, दिंड्या आणि वारकरी संप्रदायाच्या वारीचे आयोजन केले जाते.

**आध्यात्मिक संदेश :** प्रबोधिनी एकादशी ही फक्त देवजागरणाची नव्हे, तर स्वतःच्या अंतर्मनातील जागृतीचीही तिथी आहे. जीवनातील आळस, अंधकार आणि नकारात्मकता दूर करून सद्गुण, सेवा आणि भक्तीचा प्रकाश जागवण्याचा संदेश ही एकादशी देते. या दिवशी ‘ हरिनाम ’ आणि ‘ सत्कर्म ’ हेच खरे जागरण ठरते. कार्तिकी एकादशी म्हणजे भक्ती, नियम आणि उज्ज्वल जीवनाची सुरूवात. आपल्या जीवनातही या तिथीच्या निमित्ताने श्रद्धा, शुद्धता आणि जागृतीचा दिवा पेटवूया.

## प्रबोधिनी (स्मार्त) एकादशी

कार्तिक शुद्ध एकादशी ही कार्तिकी एकादशी म्हणून साजरी केली जाते. ही एकादशी मोठी एकादशी म्हणून देखील ओळखली जाते. या दिवशी वारकरी संप्रदायातील तसेच वैष्णवपंथीय एक दिवसाचे उपवासाचे व्रत करतात. चातुर्मास व्रताचा हा शेवटचा दिवस मानला जातो. कार्तिक शुद्ध एकादशीलाच प्रबोधिनी एकादशी किंवा बोधिनी एकादशी असेही म्हणतात. या दिवशी भगवान विष्णू त्यांच्या चातुर्मासातील चार महिन्यांच्या योग निद्रेतून जागे होतात व पुन्हा या सृष्टीच्या पालनाचा कार्यभार स्वीकारतात असे मानतात. त्यामुळे हिला देवोत्थनी, देव उठी एकादशी असेही म्हणतात. तुळशी विवाहाची सुरूवात होते ती याच दिवसापासून. कार्तिक पौर्णिमेस तुळशी विवाहाची सांगता होते आणि लग्नसराईचे दिवस सुरू होतात. पंढरीच्या विठुरायाचे स्मरण करण्याचा, त्याच्या नावाने उपवास करण्याचा हा दिवस.

# तुळशीजवळ ‘ या ’ ४ वस्तू ठेवल्यास होऊ शकते नुकसान ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुळस ही केवळ पूजेची नाही तर घरातील समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक मानली जाते. पण वास्तुशास्त्रात सांगितले आहे, की जर तुळशीजवळ ‘ या ’ ४ वस्तू ठेवल्या, तर पैशांचा प्रवाह थांबू शकतो आणि सुरू होऊ शकते आर्थिक संकट.

हिंदू संस्कृतीत तुळशीला ‘ पवित्र माता ’, असे म्हटले जाते. ज्या घरात तुळशी असते त्या घरात लक्ष्मीचा वास असतो, असे शास्त्र सांगते. तुळशीचे पूजन म्हणजे घरातील नकारात्मक शक्तींचा नाश आणि सकारात्मक ऊर्जेचा प्रसार. पण वास्तुशास्त्रानुसार जरी तुळशी अत्यंत शुभ मानली जात असली, तरी तिच्याजवळ काही वस्तू ठेवल्यास अनर्थ होऊ शकतो, अशी मान्यता आहे.

विशेष म्हणजे २ नोव्हेंबर २०२५ ला तुळशी-शालिग्राम विवाह असल्याने या काळात तुळशी पूजन करताना काही गोष्टी टाळणे अत्यावश्यक मानले जाते. कारण- असे मानले जाते, की तुळशीजवळ चुकीच्या वस्तू ठेवल्यास देवी लक्ष्मी रुष्ट होतात. घरात आर्थिक अडचणी निर्माण होऊ शकतात. चला तर जाणून घेऊया तुळशीजवळ ठेवणे टाळाव्यात अशा ‘ ४ वस्तू ’ कोणत्या ?

## चुकूनही तुळशीजवळ ‘ या ’ वस्तू ठेवू नका



**१) तुळशी आणि शिवलिंग एकत्र ठेवू नका**

वास्तुशास्त्र सांगते, की तुळशी आणि शिवलिंगाचे एकत्र पूजन अयोग्य मानले जाते. कारण पुराणानुसार भगवान शिव यांनी तुळशीचे पती शंखचूड यांचा वध केला होता. त्यामुळे तुळशी आणि शिव यांच्यात एक प्रकारचे दैवी वैर असल्याची आख्यायिका आहे. म्हणूनच तुळशीच्या कुंडीजवळ किंवा तिच्यासमोर शिवलिंग ठेवणे टाळावे. तसे केल्यास पूजेमध्ये दोष निर्माण होतो, अशी मान्यता आहे. अगदी शंखातून शिवलिंगावर जल चढवणेही निषिद्ध मानले जाते. त्यामुळे ही दोन पूजास्थाने नेहमी वेगवेगळी ठेवावीत.

**२) बूट-चप्पल ठेवणे अशुभ**

तुळशी ही माता लक्ष्मीचे स्वरूप मानली जाते. जेथे तुळशी असते तेथे पवित्रता आणि समृद्धी नांदते. मात्र जर आपण तिच्या आसपास बूट वा चप्पल ठेवले, तर ती पवित्रता भंगते, असे शास्त्र सांगते. अशा वेळी माता लक्ष्मी अप्रसन्न होते आणि घरात आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात, अशी ज्योतिषीय धारणा आहे. त्यामुळे तुळशीला नेहमी स्वच्छ, निर्मळ आणि उंच ठिकाणी ठेवावे. तिच्या परिसरात पायांचे स्पर्श किंवा अस्वच्छ वस्तू ठेवू नयेत.

**३) झाडू ठेवणे टाळा**

झाडूचा संबंध स्वच्छतेशी असला, तरी वास्तुशास्त्रात तो ‘ गृहस्थ जीवनातील गुप्त ऊर्जा ’ म्हणून वर्णिला आहे. तुळशीजवळ झाडू ठेवल्यास तिच्या पवित्र ऊर्जेला धक्का पोहोचतो, असे मानले जाते. त्यामुळे झाडू तुळशीच्या परिसरात ठेवू नये, विशेषतः तुळशी विवाह किंवा कार्तिक मासात र अजिबात नाही. असे केल्यास घरातील आर्थिक अडचणी वाढण्याची शक्यता असते, अशी श्रद्धा आहे. तुळशीची जागा नेहमी दिवे, फुले आणि पवित्र वस्तूंनी सजवावी. झाडू किंवा साफसफाईची साधने तेथून दूर ठेवावीत.

**४) काटेरी झाडे दूर ठेवा**

वास्तुशास्त्रानुसार तुळशीच्या आजूबाजूला काटेरी झाडे ठेवणे अत्यंत अशुभ असते. कारण- काटे म्हणजे वाद, अडथळे आणि नकारात्मक ऊर्जा. तुळशीच्या शेजारी काटेरी रोपे ठेवल्यास घरात वादविवाद, तणाव किंवा आर्थिक अडचणी वाढू शकतात, अशी ज्योतिषीय धारणा आहे. गुलाबाचे झाड ठेवायचे असल्यास ते तुळशीपासून थोड्या अंतरावर ठेवावे. कारण- गुलाब जरी सुंदर असला तरी त्याला काटे असतात. तुळशीभोवती शक्य तितके हरित, शांत आणि फुललेले वातावरण असावे.

तुळशी ही केवळ एक वनस्पती नव्हे, तर ते श्रद्धेचे प्रतीक आहे. म्हणून तुळशीचे पूजन करताना तिच्या आसपासच्या वस्तूंचा विचार काळजीपूर्वक करावा. वास्तुशास्त्रात सांगितलेले हे संकेत केवळ श्रद्धेवर आधारित आहेत. वैज्ञानिक दावे नाहीत. पण जर आपण श्रद्धेने आणि स्वच्छतेने तुळशीचे पूजन केले, तर घरातील वातावरण निश्चितच शांत आणि सकारात्मक होते, अशी श्रद्धा आहे.

